| | |
|---|---|
| १ | **कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना राज्य / राष्ट्रीय पुरस्काराबाबत.** |
| | १. समाजाची निःवार्थ भावाने आणि निष्ठेने सेवा करणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान करण्याच्या उद्देशाने शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात येतात. |
| | २. जिल्हा शिक्षक पुरस्कार, राज्य शिक्षक पुरस्कार व राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार हे शिक्षक पुरस्काराचे विविध प्रकार आहेत. राज्यस्तरावरुन "आदर्श स्त्री शिक्षिका" पुरस्कार देण्याची योजनाही कार्यान्वित आहे. जिल्हा शिक्षक पुरस्कार प्राप्त किंवा अप्राप्त शिक्षकांची राष्ट्रीय / राज्य शिक्षक पुरस्कारासाठी निवड होऊ शकते. पण राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांची मर्यादित संख्या विचारात घेता राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी सर्वसाधारणतः पुन्हा विचार केला जात नाही. |
| | ३. जिल्हा शिक्षक पुरस्कार योजना राज्यातील सर्व जिल्हा परिषदांकडून राबविली जाते. हा पुरस्कार जिल्हा पातळीवरील पुरस्कार असून, त्याची अंतिम अंमलबजावणी पूर्णतः जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा स्तरावरील जिल्हा निवड समितीमार्फत जिल्हा परिषद पातळीवरुन केली जाते. |
| | ४. राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार योजना १९५८-५९ पासून महाराष्ट्र राज्यात कार्यान्वित असून ती शालेय शिक्षण विभाग या प्रशासकीय विभागामार्फत राबविली जाते. राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराची रक्कम केंद्र शासनाने १९९९ च्या पुरस्कारापासून रु. २५,०००/- अशी केली आहे. या पुरस्कारासाठी राज्यातील १८ प्राथमिक, ८ माध्यमिक, ३ विशेष शिक्षक (प्राथमिक २ व माध्यमिक १) अशा एकूण २९ शिक्षकांची निवड केली जाते. |
| | ५. राज्य शिक्षक पुरस्कार योजना १९६२-६३ पासून महाराष्ट्र राज्यात कार्यान्वित असून ती शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग या दोन प्रशासकीय विभागांमार्फत राबविली जाते. १९९६-९७ पासून राज्य शिक्षक पुरस्काराची रक्कम रु.५,०००/- वरुन रु.७,५००/- अशी करण्यात आलेली आहे. |
| | ६. राष्ट्रीय / राज्य शिक्षक पुरस्कारासाठी शिक्षकांची जिल्हा स्तरावर प्राथमिक निवड जिल्हा निवड समित्यांकडून होते. अंतिम निवड राज्य निवड समितीकडून होते. |

| | |
|---|---|
| | **७.** राष्ट्रीय / राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना पुरस्कार जाहीर झाल्याच्या दिनांकापासून दोन आगाऊ वेतनवाढी देण्याची राज्य शासनाची योजना कार्यान्वित आहे. जे शिक्षक त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेपर्यंत पोहोचले असतील अशा शिक्षकांना त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेच्या अगोदरच्या वेतनवाढीच्या ४८ पट ठोक रक्कम देण्यात येते. वेतनश्रेणीच्या कमाल मर्यादेच्या एक टप्पा अगोदर वेतन घेणाऱ्या शिक्षकांना एक आगाऊ वेतनवाढ आणि वेतनवाढीच्या २४ पट ठोक रक्कम देण्यात येते. तसेच, जे शिक्षक, पुरस्कार जाहीर झालेल्या दिनांकापूर्वी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असतील अशा पुरस्कारप्राप्त शिक्षकांना / मुख्याध्यापकांना अनुक्रमे रुपये ३,०००/- व रुपये ५,०००/- ठोक रक्कम देण्यात येते. |
| | **८.** वेतनवाढी / ठोक रक्कम मंजूर करण्याचे अधिकार पुरस्कारप्राप्त शिक्षक राजपत्रित असल्यास शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण / प्राथमिक शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना असून इतरांच्या बाबतीत तसे अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आलेले आहेत. या आगाऊ वेतनवाढीमुळे पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या नियमित वार्षिक वेतनवाढीच्या दिनांकात बदल होत नाही. |
| | **९.** राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना रेल्वे प्रवासात दुसऱ्या वर्गाच्या भाड्यात सवलत देण्याची केंद्र शासनाची योजना कार्यान्वित आहे. संबंधित शिक्षकांना टिकाऊ स्वरुपातील विहित नमुन्यातील फोटोसहित ओळखपत्र विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या सहीने देण्यात येते. राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना ही योजना लागू नाही. |
| | **१०.** राष्ट्रीय / राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षकांना पुरस्कार घोषित झाल्याच्या दिनांकापासून आगाऊ वेतनवाढी मंजूर करताना अन्य कारणास्तव पूर्वी केव्हा आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या होत्या, याचा विचार करण्यात येत नाही. परंतू राष्ट्रीय / राज्य पुरस्कारार्थ दोन वेतनवाढी शिक्षकांना मंजूर झाल्यानंतर अन्य कोणत्याही आगाऊ वेतनवाढीसाठी त्यांचा पुढील पाच वर्षात विचार केला जात नाही. |
| | **११.** प्रत्येक शैक्षणिक वर्षी शासनाकडील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग स्तरावर असे पुरस्कार जाहीर करण्यात येतात. |
| | **१२.** या शिक्षकांना पुरस्काराची रक्कम खास समारंभात दिनांक ५ सप्टेंबर, २००९ रोजी प्रदान करण्यात येते. |